धर्म संस्थापनार्थाय अखिल युद्धाय कृतनिश्चयः

धर्मराज्य पक्ष

अध्यक्ष
राजन राजे

संदर्भ क्र.________ दिनांक : १७/०७/२०१४

<u>धर्मराज्य पक्षाचा महाराष्ट्राच्या मुख्यमंत्र्यांना इशारा</u>

# परप्रांतियांच्या दादागिरीला वेळीच वेसण घाला,अन्यथा मराठी माणसांच्या हितासाठी रस्त्यावर उतरावे लागेल

**प्रतिनिधी**

दि. १६ – परप्रांतियांच्या दादागिरीला वेळीच वेसण घाला,अन्यथा मराठी माणसांच्या हितासाठी 'धर्मराज्य पक्षा'ला रस्त्यावर उतराव लागेल, असा इशारा धर्मराज्य पक्षाचे उपाध्यक्ष नितीन देशपांडे यांनी मुख्यमंत्री पृथ्वीराज चव्हाण यांना दिला आहे.

शाळेच्या आवारात परस्परांशी मराठीत बोलणाऱ्या आठवीत शिकणाऱ्या तब्बल २८ विद्यार्थी-विद्यार्थिनींना पुण्यातील पिंपरी येथील प्रियदर्शनी स्कुलचे शाळेतील संचालक आणि मुख्य कार्यकारी अधिकारी जितेंद्र इंद्रमल सिंग या परप्रांतीयाने बेदम मारहाण केल्याची घटना 'चाईल्ड लाईन' या संस्थेने उघडकीस आणली आहे, याप्रकरणी पालक आणि सर्वपक्षीय नेत्यांनी संस्थेसमोर आंदोलन केल्यानंतर पोलीसांनी फिर्याद नोंदवून घेतली आणि घटना उघडकीस आल्यानंतरही दोन दिवसानंतर जितेंद्र इंद्रमल सिंग याला अटक झाली, या सर्वच प्रकरणावरून असे दिसते की, महाराष्ट्रात राहूनही परप्रांतियांची गुर्मी प्रचंड वाढली आहे. या गुर्मीचे कारण म्हणजे महाराष्ट्र शासन आणि शासकीय यंत्रणा यांचा कोणताही धाक या परप्रांतियांवर राहिलेला दिसत नाही. यामुळे महाराष्ट्रातच 'मराठी' बोलणाऱ्या मराठी विद्यार्थी-विद्यार्थिनींना बेदम मारहाण करण्यापर्यंत परप्रांतिय शाळांतील संचालकांची मजल गेली आहे. यामुळे सदर प्रकरणी आपण तत्काळ कारवाई करून परप्रांतिय संचालक जितेंद्र इंद्रमल सिंग याच्याविरोधात कडक कारवाई करण्याचे पोलीसांना आदेश द्यावेत, तसेच यापुढे पुन्हा असे प्रकरण होऊ नये याची दक्षता घ्यावी, अन्यथा मराठी माणसांच्या हित संरक्षणासाठी धर्मराज्य पक्षाला मैदानात उतरावे लागेल, याची नोंद घ्यावी, असा इशारा धर्मराज्य पक्षाचे उपाध्यक्ष नितीन देशपांडे यांनी मुख्यमंत्री पृथ्वीराज चव्हाण यांना एका निवेदनाद्वारे दिला आहे.